दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १७३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.२३ सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## पेण येथे होणार ९६० मेगावॅटचा पीएसपी प्रकल्प

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्र हे देशामध्ये गुंतवणूक करणाऱ्या उद्योजकांची पहिली पसंती असून जेएसडब्लू कोकणामध्ये सुमारे ४२०० कोटींची गुंतवणूक करणार असल्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज येथे सांगितले.

आज पेण (रायगड) येथील जेएसडब्लू निओ एनर्जी प्रकल्पाच्या सामंजस्य करारासंदर्भात आयोजित मंत्रालयातील बैठकीत मंत्री श्री. सामंत बोलत होते. पेण येथे ९६० मे.वॅ. चा पीएसपी प्रकल्प होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. जेएसडब्लूच्या या प्रकल्पाच्या माध्यमातून थेट सुमारे ४५० तरूणांना कायमस्वरूपी नोकरी मिळणार असून मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष – अप्रत्यक्षपणे रोजगार निर्माण होणार आहे. तरुणांना जास्तीत – जास्त रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी उद्योग विभाग काम करीत असल्याचे श्री. सामंत यांनी सांगितले.

एनआयए आणि ईडीच्या संयुक्त कारवाई

## पनवेलमधून एकाला घेतले ताब्यात



**दै.रायगड नगरी । पनवेल**

राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) आणि अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) देशातील वेगवेगळ्या राज्यात छापेमारी केली आहे. या कारवाईत दहशतवाद्यांशी संबंध असल्याच्या आरोपाखाली पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियाच्या १०० सदस्यांना ताब्यात घेतलं आहे. देशभरातील १० राज्यांत एनआयए आणि ईडीने संयुक्तरित्या ही छापेमारी केली आहे.

एनआयए आणि ईडीने आंध्रप्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, केरळ, कर्नाटक, तामिळनाडू आणि अन्य काही राज्यात छापेमारी केली आहे. यामध्ये नवी मुंबईतील नेरुळ येथील पीएफआयच्या कार्यालयात रात्री ३ च्या सुमारास छापेमारी केली आहे. त्याचप्रमाणे पनवेलमध्ये सुद्धा छापेमारी करण्यात आली आहे. दहशतवाद्यांना निधी पुरवणे, प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे, बंदी घातलेल्या संघटनांत नागरिकांना सामील होण्यासाठी प्रोत्साहित आणि बेकायदेशीर कृत्य करणे या आरोपांखाली पीएफआयच्या सदस्यांना ताब्यात घेण्यात आलं आहे. यामध्ये नवी मुंबईतील नेरुळमधून ४ जणांना तर पनवेल मधून एकाला ताब्यात घेतले आहे.

# आठवड्याभरात काँक्रीटीकरणाची निविदा न निघाल्यास पुन्हा आंदोलन...

## आ.प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनापुढे सिडको प्रशासन नरमले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**नवीन पनवेल उड्डाणपुलावरील खड्डे भरण्यासाठी तसेच कॉंकिटीकरण करण्याच्या मागणीसाठी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या आंदोलनापुढे सिडको प्रशासन नमले असून येत्या रविवार पर्यंत उड्डाणपुलावरील खड्डे भरण्याचे तसेच आठवड्याभरात उड्डाणपुलाच्या चारी बाजूंचे कॉंक्रिटीकरण करण्याची निवीदा काढण्यात येईल असे आश्वासन सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना दिले. त्यानंतर भरपावसात सुरु असलेले आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र जर येत्या आठवड्या भरात हे काम झाले नाही तर आमच्यासाठी आंदोलनाचा मार्ग मोकळा आहे असा इशारा आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी झालेल्या रस्तारोको आंदोलनावेळी सिडको प्रशासनाला दिला.**



आंदोलकांनी रस्ता अडवल्यावर सिडकोचे बांधकाम खात्याचे कार्यकारी अभियंत्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना भेटून आम्ही दोन महिन्यात टेंडर प्रोसेस सुरू करतो तुम्ही आंदोलन मागे घ्या सांगत होते. पण त्याला नकार देऊन सर्वांनी पावसात रस्त्यावर ठाण मांडले तर काहीजण रस्त्यावर झोपले. शेवटी सिडको प्रशासन या आंदोलनापुढे नमले असून येत्या सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे यांनी येत्या रविवार पर्यंत या उड्डाणपुलावरील खड्डे भरण्यात येतील तसेच आठवड्याभरात या पुलाच्या चारी बाजूंचे कॉंकिटीकरण करण्याची निवीदा काढण्यात येईल असे आश्वासन आमदार प्रशांत ठाकूर यांना फोन करून दिले. त्यानंतर भरपावसामध्ये सुरू असलेले आंदोलन मागे घेण्यात आले.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, सिडको प्रशासन आंदोलनासाठी दिलेल्या नोटीशीची दखल घेत नाही हे या आजच्या आंदोलनातून पुन्हा समोर आले आहे. जो पर्यंत हा पुल महापालिकेकडे हस्तांतरीत होत नाही तो पर्यंत या पुलाची जबाबदारी सिडको प्रशासनाची आहे मात्र सिडकोचे अधिकारी कामचुकारपणा करत असल्यामुळे नागरीकांना या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. दुर्दैवाने सिडको आंदोलन केल्या शिवाय कोणताही निर्णय घेत नाही असे सांगितले तसेच दिलेले आश्वासन पाळले गेले नाही तर आमच्या पुढे पुन्हा आंदोलन करण्यासाठीचा मार्ग मोकळा आहे असा इशारा सिडको प्रशासनाला दिला.

नवीन पनवेल माथेरान महामार्गाला जोडणाऱ्या या पूलामुळे पनवेल तालुक्यातील नेरे आणि माथेरानकडे जाणारी शेकडो गावे, वाड्या, पाडे जोडली असून दळणवळणाचा हा प्रमुख मार्ग आहे. या उड्डाण पुलाची पावसामुळे दूरवस्था झाली आहे. या खड्ड्यामुळे रोज अपघात होऊन अनेक जण जखमी झाले अलस्याच्या घटना घडल्या आहेत. या पूलावरिल रहदारीचा विचार करता पूलाच्या उतारावरील दोन्ही बाजूला सिमेंट कॉंकिटीकरण होणे गरजेचे असताना सिडको त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने हा उड्डाण पूल खड्डे मुक्त करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी भर पावसामध्ये पूलावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आला.

या आंदोलनात पनवेल महापालिकचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, सुनिल घरत, माजी नगरसेवक ॲडव्होकेट मनोज भुजबळ, संतोष शेट्टी. नितिन पाटील, अजय बहिरा, मनोहर म्हात्रे, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका चारुशीला घरत, सुशीला घरत, ॲडव्होकेट वृशाली वाघमारे, राजश्री वावेकर, भिमराव पोवार, शशिकांत शेळके, दक्षिण भारतीय सेलचे जिल्हा संयोजक श्रीनिवास कोहरु, ॲडव्होकेट जितेंद्र घरत, माजी नगरसेविका संगीता कांडपाल, गौरव कांडपिळे, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, पंचायत समितीचे सदस्य राज पाटील, भाजप युवामोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर, खांदाकॉलनी युवामोर्चा अध्यक्ष अभिषेक भोपी, पनवेल शहर अध्यक्ष रोहित जगताप, उदीत नाईक, विवेक होन, अक्षय सिंग, देवांशू प्रभाळे, अशोक आंबेकर, पप्पू साळवे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भर पावसात आंदोलक रस्त्यावर!

दरम्यान गुरुवारी सकाळी मोठ्या प्रमाणात पाऊस पडला. असे असले तरी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संदीप पाटील यांच्या पुढाकाराने पुकारलेल्या या आंदोलनात भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी हिरीरीने सहभाग घेतला. सर्वांनी पावसात भिजत सिडको विरोधात घोषणाबाजी केली. जोपर्यंत उड्डाणपुलाच्या कॉंक्रिटीकरणाचे ठोस आश्वासन मिळत नाही तोपर्यंत येथून उठणार नाही अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली. सिडकोने नमते धोरण घेत त्वरित याबाबत कार्यवाही करण्याची ग्वाही दिली.

### रुग्णवाहिकेला दिली वाट

एचडीएफसी सर्कल येथे रस्ता रोको केल्यामुळे पनवेल माथेरान रोड वर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. खांदा कॉलनी आणि पोदी मार्गे वाहन वळवण्यात आले. यादरम्यान एक रुग्णवाहिका अडकल्याचे पाहून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सूचनेनुसार रुग्णवाहिकेला वाट करून देण्यात आली.

## कामार्लीतील बँक ऑफ इंडियाचा एटीएम फोडण्याचा प्रयत्न

### १ अटक ; १ फरार



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील कामार्ली येथील बँक ऑफ इंडिया बँकेचा एटीएम फोडण्याचा प्रयत्न करण्याची घटना गुरवार रोजी पहाटे घडली आहे. एटीएम फोडण्याचा प्रयत्न झाल्याची बातमी पसरतात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

पेण तालुक्यातील कामार्ली गावात बँक ऑफ इंडियाचा एटीएम जिलेटिनच्या साहाय्याने फोडून दरोडा टाकण्याचा अयशस्वी प्रयत्न करण्यात आला आहे. गुरवारी पहाटे ३.०० ते ३.३० च्या दरम्यान पुणे जिल्ह्यातील रहिवाशी संतोष कांबळे (वय ३४ ) हा आरोपी व त्याचा साथीदार कामार्ली येथील एटीएम वर दरोडा टाकण्याच्या उद्देशाने आले होते. कामार्ली येथील ग्रामस्थांनी एटीएम जवळ संशयितरित्या कृत्य करणाऱ्या दोन अनोळखी व्यक्तींना पाहिले. त्याच वेळेला रात्रीच्या गस्तीवर असलेले पेण पोलीस ठाण्याचे निरीक्षक देवेंद्र पोळ व त्यांच्या सहकार्याने नागरिकांच्या मदतीने आरोपी संतोष कांबळे याला ताब्यात घेतले तर त्याचा दुसरा साथीदार मात्र यावेळी पळून जाण्यात यशस्वी ठरला आहे.

या संदर्भात पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला असून अधिक तपास पोलीस निरिक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस तडवी हे करत आहेत.

## माणगांव नगरपंचायतीच्या मुख्याधिकारीपदी संतोष माळी

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**



माणगांव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांची बदली झाली असून संतोष माळी हे बदलीने रिक्त झालेल्या पदावर रुजू झाले आहेत. याआधी संतोष माळी उरण नगरपंचायतीचे मुख्याधिकारी म्हणुन कार्यरत होते. आज बुधवार दिनांक २१ सप्टेंबर २०२२ रोजी संतोष माळी यांनी माणगाव नगरपंचायतीचा पदभार स्वीकारला आहे.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) व ४ (५) मधील तरतुदीनु–सार, मुख्याधिकारी, गट–ब संवर्गातील अधिकाऱ्याची प्रशासकीय कारणास्तव सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने ही बदली करण्यात आलेली आहे. राहुल इंगळे यांची अचानक बदली झाली आणि त्यांचा नगरपंचायत कर्मचारी यांनी केलेला निरोप कार्यक्रम देखील गुलदस्त्यात ठेवण्यात आला याबद्दल विशेष गुप्तता बाळगलेली पाहायला मिळाली.

राहुल इंगळे यांचा माणगांव शहरातील कारभार कभी खुशी कभी गम अशा स्वरूपाचाच पहायला मिळाला आहे. शहराचे नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी या हे शहराचे विकासाची महत्वाची भूमिका बजावत असतात ही विकासाची दोन चाके मानली जातात. आता नवीन आलेले मुख्याधिकारी संतोष माळी यांना सोबत घेऊन नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांनी शहरातील नागरिकांच्या हिताचे निर्णय घेताना सत्ताधारी आणि विरोधकांना सोबत घेऊन, राजकीय हेवे देव्यांचे निरसन करून शहराचा विकास करावा असे सुजाण नागरिकांचे मत आहे.

## उरणजवळ बस-कार धडक ; १ जखमी



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण शहराकडून नवीमुंबई शहराकडे जाणाऱ्या एन एम एम टी बस व वँगनर गाडीची समोरा समोर धडक झाल्याने सदर अपघातात वँगनर गाडीचा चालक जखमी झाला आहे.सदर अपघात हा गुरवार दि२२ सप्टेंबर रोजी सकाळी ६–१५च्या सुमारास घडला आहे.

सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार उरण शहरातून नवीमुंबई शहराकडे जाणाऱ्या एन एम एम टी या प्रव–ाशी बस गाडीला करळ उड्डाणपूलावरुन विरुद्ध दिशेने येणाऱ्या वँगनर गाडीनी समोरा समोर धडक दिली. सदर अपघातात वँगनर गाडीचा चालक जखमी झाला आहे. या अपघाताची माहिती मिळताच न्हावा शेवा वाहतूक पोलीस यंत्रणेच्या कर्मचाऱ्यांनी तसेच न्हावा शेवा पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी घटना स्थळी धाव घेऊन जखमी चालकास तातडीने

...२

नवरात्रोत्सव उत्साहात आणि शांततेत पार पाडण्यासाठी

## पनवेल तालुका पोलीस स्थानकाचे वतीने मार्गदर्शनपर बैठक संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

येणारा नवरात्रोत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडण्यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिमंडळ २ अंतर्गत पनवेल तालुका पोलीस स्थानका नजीक असणाऱ्या मंथन हॉल येथे अत्यंत महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात. बुधवार दिनांक २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी पार पडलेल्या या बैठकीला पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पोलीस सहआयुक्त भागवत सोनावणे आणि पनवेल तालुका पोलीस स्थानकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर उपस्थित होते.

पनवेल तालुका पोलीस स्थानकाच्या हद्दीतील नवरात्रोत्सव मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि शांतता कमिटीचे प्रतिनिधी या बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना शिवराज पाटील यांनी महत्त्वपूर्ण अशा सूचना केल्या. ते म्हणाले की मा. न्यायालयाने निर्गमित केलेले आदेश व महानगरपालिका तसेच संबंधित स्थानिक प्रशासनाचे मंडपाबाबतचे धोरण यांचेशी सुसंगत तसे मर्यादित स्वरूपाचे मंडप उभारण्यात यावे. तसेच सार्वजनिक दुर्गा मुर्तीची सजावट करतांना त्यात भपकेबाजी नसावी कोणताही आक्षेपार्ह देखावा नसावा ते पुढे म्हणाले की नवरात्रौत्सव ठिकाणी जातीय/धार्मिक भावना भडकून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल असे आक्षेपार्ह बॅनर,पोस्टर्स, देखावा किंवा फलक नसवा. त्याचप्रमाणे अशा प्रकारचे रेकॉर्डस/गाणी वाजविण्यात येवू नयेत.

...२


# ‘रुपी’ची कुरुपी का झाली?

अनेक वर्षांच्या व्यवसाय स्थगितीनंतर अखेर रुपी सहकारी बँकेला टाळे लागणे, निश्चित झाले आहे. न्यायसंस्थेनेच यात काही हस्तक्षेप करून वेगळा निर्णय दिला तरच ही अवस्था बदलू शकते. शंभर वर्षांची परंपरा असणारी ही बँक अशी अवसायनात काढण्यापूर्वी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने या बँकेचे इतर शक्तिशाली बँकेत विलिनीकरण करण्याचा पर्याय ताडून पाहणे आवश्यक होते. तसे झालेले नाही. ते का झाले नाही, हे रिझर्व्ह बँक, महाराष्ट्र सरकारचे सहकार खाते आणि केंद्रात नव्याने निर्माण केलेले सहकार खाते यांनी सांगायला हवे. रुपी बँकेच्या कर्मचाऱ्यांच्या संघटनेने ’बँकेचा परवाना रद्द करू नये, नवी प्रशासकीय रचना करावी आणि व्यवस्थापन नीट न सांभाळल्याबद्दल कारवाई करावी,’ अशी मागणी मुंबई उच्च न्यायालयात केली होती. मात्र, ही याचिका योग्य त्या न्यायपीठापुढे करावी, असे सुचवून न्यायालयाने ही याचिका ऐकलेली नाही. एका अर्थाने बँक वाचविण्याचा हा अखेरचा प्रयत्न होता. मात्र, तो तूर्त असफल झालेला दिसतो. रुपी बँकेचा गेला दोन दशकांत जो प्रवास झाला आहे, त्यातून खातेदार, ठेवीदार, कर्मचारी, व्यवस्थापन आणि एकंदरीत सहकारी बँकिंग या साऱ्यांच्याच दृष्टीने महत्त्वाचे प्रश्न उभे राहिले आहेत. त्यांची सोडवणूक केली नाही तर रुपी बँकेचे हे बलिदानही व्यर्थ जाईल आणि इतरही सहकारी बँका या सापळ्यात सापडतील. देशभरात सहकारी बँकांचे जाळे असले तरी ते दक्षिणेतील राज्यांमध्ये सर्वांत बळकट आहे. त्यातही, महाराष्ट्र हे तर सहकार क्षेत्राचे एकेकाळी नंदनवन होते. मात्र, देशात दोन हजारांच्या आसपास असणाऱ्या सहकारी बँकांची संख्या घटून दीड हजाराच्या आसपास आली आहे. बँका बुडाल्याने, बंद पडल्याने आणि आर्थिक शिस्त न पाळली गेल्याने ही अवस्था आली आहे, हे याचे एक कारण आहे. यात लक्षावधी ठेवीदारांचे अब्जावधी रुपये एकतर बुडाले किंवा अडकले. महाराष्ट्रातही रुपी बँकेसहित गेल्या काही वर्षांत बुडालेल्या अनेक सहकारी बँकांच्या खातेदारांचे हाल हाल झाले आहेत. सहकारी बँकांना कठोर शिस्त लावायला हवी, हे रिझर्व्ह बँकेचे मत काही जुने नाही. या बँकांचे नियंत्रण आपल्याकडे असावे, हा रिझर्व्ह बँकेचा आग्रह जवळपास पुरा झाला आहे. मात्र, इतर मोठ्या व्यापारी बँका, राष्ट्रीयीकृत बँका आणि नेटाने व्यवसाय करणाऱ्या सहकारी बँका यांच्यात सरकार किंवा रिझर्व्ह बँक भेदाभेद का करते, या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर आजवर कधीही मिळालेले नाही.याचा अर्थ, सहकारी बँकांनी वेळेवर निवडणुका घेऊ नयेत, संचालकांनी बेबंद कारभार करावा, कर्जप्रकरणे होताना गैरप्रकार व्हावेत आणि व्यवसाय वाढीचे संतुलन टिकवू नये; असे नाही. मात्र, राष्ट्रीयीकृत बँकांची हजारो कोटी रुपयांची बुडीत कर्जे रिझर्व्ह बँक सावरून घेते. त्यांचे ताळेबंद साफसूफ करते. मग रुपीसारखी एखादी बँक दुसऱ्या मोठ्या बँकेत विलीन होऊन एक नवी संधी मागत असेल, तर ती का द्यायची नाही? सहकारी बँकांवर रिझर्व्ह बँकेने लादलेल्या अनेक बंधनांची चर्चा या आधी झाली आहे. त्यात निम्मी कर्जे २५ लाखांच्या आत देणे, अग्रक्रम क्षेत्राचा कर्जपुरवठा ४० वरून ७५ टक्के करणे किंवा समूहकर्ज मर्यादेत कपात अशी अनेक आहेत. करोना काळातही राष्ट्रीयीकृत बँकांची कर्जमर्यादा २० टक्क्यांनी वाढविण्यात आली होती. तेही सहकारी बँकांबाबत झाले नाही. एकीकडे, बेसुमार व्याजाचे आमिष दाखवून घोटाळे होत असताना सहकारी बँकिंग मजबूत होणे आवश्यक आहे. या बँका व्यक्तिगत संबंध ठेवतात. त्यांचा प्रशासकीय खर्च कमी असतो. मात्र, नागरी सहकारी बँकांकडे राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांचे लक्ष गेल्यानेही अनेक समस्या चिघळल्या आहेत. सहकार क्षेत्रातील अडचणीत असणाऱ्या संस्थांना केंद्र सरकार मदतीचा हात देईल, असे आश्वासन केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांनी देऊन दोन दिवस होत नाहीत, तोच रुपी बँकेवर इतिहासजमा होण्याची वेळ आली आहे. मात्र, सहकार्याचा हात पुढे करतानाच शहा यांनी ’अनेकदा राज्य सरकारे याबाबत पुरेशी माहिती केंद्राला देत नाहीत,’ अशी तक्रार केली आहे. याचा अर्थ, रिझर्व्ह बँक, केंद्र सरकार आणि राज्य सरकार या तिघांचा ताळमेळ झाला तरच उद्या सहकारी बँकिंग आणि एकूणच सहकार क्षेत्र तरणार आहे. उद्या सहकारी बँका बुडणे आणि ठेवीदार अडचणीत येणे, हे संकट रोखायचे असेल तर अडचणीतल्या नागरी बँका हुडकून त्यांचे आर्थिक व्यवस्थापन सुधारणे किंवा मोठ्या बँकांत विलीन होणे, हे काम तातडीने करावे. रिझर्व्ह बँकेने थोडा उदार दृष्टिकोन स्वीकारला असता तर रुपी बँकेला नामशेष करण्याऐवजी सन्मानाने निरोप देता आला असता. मात्र, भारतीय बँकिंगचे व्यवस्थापन आणि नियमन दुटप्पी निकषांनी चालते. मग दुसरे काय होणार?

# नागरिकांच्या प्रलंबित अर्जांचा स्थानिक पातळीवर जलदगतीने निपटारा करण्यासाठी विशेष मोहीमेची आढावा बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात दि.१७ सप्टेंबर ते दि.०२ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा निमित्ताने आपले सरकार, नागरी सेवा केंद्र व इतर वेबपोर्टलवरील नागरिकांच्या प्रलंबित अर्जांचा स्थानिक पातळीवर जलदगतीने निपटारा करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या निमित्ताने जिल्हा प्रशासनाने शून्य प्रलंबिततेचा संकल्प केला आहे. त्यानुषंगाने या मोहिमेच्या कार्यवाहीबाबतच्या सद्य:स्थितीचा आढावा दूरदृष्यप्रणालीद्वारे अपर जिल्हाधिकारी अमोल यादव यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयातून घेतला.



यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील, तहसिलदार विशाल दौंडकर, सचिन शेजाळ, जिल्हा प्रशासन अधिकारी शाम पोशट्टी, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी गोविंद वाकडे, सर्व प्रांताधिकारी, तहसिलदार, मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी आदी उपस्थित होते.

या विशेष मोहिमेंतर्गत विविध विभागांच्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नवीन शासन निर्णयानुसार मदत निधीचे वितरण, पंतप्रधान किसान सन्मान निधीचा प्रलंबित पात्र लाभार्थ्यांना लाभ, फेरफार नोंदीचा निपटार, शिधापत्रिकांचे वितरण, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, मालमत्ता हस्तांतरण नोंद, नव्याने नळ जोडणी, मालमत्ता कराची आकारणी करणे व मागणी पत्र, प्रलंबित घरगुती विद्युत जोडणीस मंजूरी, मालमत्ता हस्तांतरणानंतर विद्युत जोडणीमध्ये नवीन मालमत्ताधारकांचे नाव, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेंतर्गत सिंचन विहिरीकरिता अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी, अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना प्रलंबित वन हक्कपट्टे मंजूर करणे, दिव्यांगांना प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र अशा चौदा सेवांचा प्रामुख्याने समावेश आहे. नागरिकांनी आपल्या नजिकच्या शासकीय कार्यालयाशी संपर्क साधून आपल्या प्रलंबित अर्जाचा निपटारा करुन घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने या बैठकीच्या माध्यमातून केले आहे. याशिवाय या बैठकीत लम्पी आजार व त्यावरील उपाययोजना, ई-फेरफार आदी विषयांबाबतचाही आढावा घेण्यात आला.

# करंजा समुद्र किनाऱ्यावर अज्ञात व्यक्तीचा मृतदेह

**दै.रायगड नगरी । उरण**

करंजा समुद्र किनाऱ्यावर अज्ञात व्यक्तीचा मृत देह बुधवारी ( दि२१) आढळून आला आहे. सदर मृतदेह हा पुरुषांचा असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. पुरुष जातीच्या व्यक्तीची सडलेल्या अवस्थेत मुत देह आढळून आला असून उरण इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात पोस्ट माटमसाठी नेण्यात आला आहे. सदर व्यक्तीच्या अंगावर शर्ट आणि हाप पंड असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.मुत देहाची ओळख पटली नसून पोलीस यंत्रणा तपास करत असल्याची माहिती उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील यांनी दिली.

# आरबीला जाण्याच्या भीतीने स्वत:च्या अपहरणाचा रचला डाव

**दै.रायगड नगरी । माथेरान**

काल दि. २१ रोजी माथेरान मध्ये एका मुलाला अपहरण करण्याचा प्रयत्न फसला अशी घटना घडली होती परंतु पोलीस तपासांती असे समोर आले आहे की अरबी शिक्षण घेण्यासाठी पालकांकडून होत असलेल्या सक्तीमुळे मुलाने स्वतःच्या अपहरणाचा किस्सा रंगवून सांगितल्याने पालकांमध्ये घबराट पसरवून ही बातमी सर्वत्र वनव्यासारखी पसरली होती त्यामुळे सर्वत्र तर्कवितर्क लढविले गेले.

दोन दिवसांपूर्वी माथेरान मध्ये सायंकाळी अरबी शिक्षणासाठी जात असलेल्या मुलाला अपहरण करण्याचा प्रयत्न झाला असे माथेरान मध्ये सर्वत्र पसरले होते सदर घटनेतील मुलाने आपल्या आई-वडिलांना आपले अपहरण करण्यासाठी दोन मास्क धारी ईसमानी प्रयत्न केला अशी माहिती दिली होती परंतु बैठकीसाठी निघालेले दोन इस्मानमुळे आपल्याला सोडून अपहरण करणारे पसार झाले असेही सांगितले होते त्यामुळे सदर मुलाच्या वडिलांनी थेट पोलिसांशी संपर्क साधून घटनेची प्राथमिक माहिती दिली होती त्यावेळी पोलिसांनी ताबडतोब त्यावरती कारवाई करत सदर भागातील सीसीटीव्ही फुटेज तपासले होते व हे सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर एक धक्कादायक माहिती समोर आली होती हा मुलगा ज्या वेळेमध्ये सदर घटना घडली हे सांगत होता त्यावेळेस त्या भागामध्ये फिरकलाच नाही या ठिकाणी असलेल्या तीन ठिकाणच्या सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर सदर गोष्टीला दुजोरा मिळाला होता तेव्हा मात्र पोलिसांना वेगळा संशय आल्याने त्यांनी घरातील पालकांशी चर्चा केली असता सदर मुलाला अरबी शिक्षण घेण्यासाठी जाण्यास टाळाटाळ करत असल्याचे समोर आले व आपणास या शिक्षण घेण्यास पालकांनी सक्ती करू नये म्हणून मुलांनीच हा सर्व बनाव रचल्याचे समोर आले आहे.

या घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या मानसिकतेत मध्ये घडणारे बदल समोर येत असून पोलिसांनी तातडीने दाखवलेल्या तत्परतेमुळे हा बनाव उघड झाला आहे ह्या घटनेमुळे पालक वर्गामध्ये मात्र कमालीच्या चिंतेचे वातावरण असून आज बहुतेक पालक आपल्या मुलांना शाळेमध्ये व इतर ठिकाणी सोबत जाताना दिसून येत होते त्यामुळेच माथेरानचे एपीआय श्री शेखर लव्हे यांनी सर्व पालक वर्गाची भेट घेऊन कोणत्याही अफेवरती विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे त्याचप्रमाणे सुरक्षिततेचा उपाय म्हणून ह्या शाळेतील मार्गावर पोलीस तैनात केले जातील असेही पालक वर्गाला आश्वासन दिले आहे.

अपहरणाचा बनाव जरी उघड झाला असला तरी हा निमित्ताने माथेरान मध्ये आवश्यक असलेल्या तिसऱ्या डोळ्याचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले असून माथेरानच्या प्रमुख ठिकाणी व माथेरान प्रवेशद्वार पासून ते शहरापर्यंतच्या प्रमुख मार्गावरती ठिकाणांवरती सीसीटीव्ही असने किती गरजेचे आहे हे समोर आले असून नादुरुस्त सीसीटीव्ही ताबडतोब दुरुस्त करून माथेरानचे पर्यटन व नागरिकांना दिलासा मिळेल असे सीसीटीव्ही त्वरित सुरू व्हावेत अशी मागणी या निमित्ताने समोर येत आहे.

खोट्या अपहरणाचा डाव रचून सदर विद्यार्थ्याने केलेला बनाव उघड झाल्यामुळे सर्व पालक वर्गाला विनंती आहे की कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये माथेरान मध्ये अशा प्रकारची कोणती घटना घडलेली नसून सुरक्षिततेचे सर्व बाबी पोलिसांकडून वेळोवेळी तपासल्या जात आहे तरीही अशा प्रकारचे भविष्यात कोणती अनुचित घटना घडू नये याकरिता माथेरान मध्ये येणाऱ्या फेरीवाले व संशयित व्यक्तींवर पोलिसांनी आपले लक्ष केंद्रित केले असून कोणत्याही नागरिकांना कोणी संशयित व्यक्ती आढळल्यास त्यांनी ताबडतोब माथेरान पोलीस संपर्क साधावा

शेखर लव्हे, एपीआय माथेरान

# खा.सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आयोजित जंगी कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । तळा**

खासदार सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आयोजित नाचाचे जंगी कार्यक्रम दिनांक २२ सप्टेंबर २०२२ रोजी तळा येथील श्री चंडिका देवी मंदिराच्या रंगमंचावर आयोजित करण्यात आला होता. अतिशय उत्साही वातावरणात हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला खासदार सुनील तटकरे युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत समाजाला प्रेरित असणार्या लोकाभिमुख कार्यक्रमाचे नेहमीच आयोजन केले जाते. कला, क्रीडा, साहित्य, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा विविध कार्यक्रमातून समाजाला दिशा देण्याचे काम युवा प्रतिष्ठानने सदैव केलेले आहे.



आपल्या लोककला लोप पावत असताना या कलांना ऊर्जा देऊन त्यांचे जतन करण्याचे काम केले जात आहे. कोकणात गौरी गणपतीच्या सणांमध्ये बालेनाच सर्वत्र खेळले जातात. परंतु दिवसेंदिवस या कलांकडे दुर्लक्ष होत असताना त्यांना ऊर्जितावस्ता देण्याच्या दृष्टीने सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान तर्फे तळा शहरात नाचाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. शाहीर सुरेश महाबळे व शाहीर रामभाऊ टेंबे यांचे मार्गदर्शनाखाली हे नाचाचे कार्यक्रम होत असताना तालुक्यातील १७ नाच मंडळांनी सहभाग घेतला आहे. अतिशय रंगतदारपणे हा कार्यक्रम सुरू असताना तालुक्यातील हौशी रसिक नागरिकांनी फार मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे. गणपतीच्या क्षणादरम्यान याच युवा प्रतिष्ठान तर्फे पैठणीच्या कार्यक्रम महिलांचे नात्यांचे कार्यक्रम यासारखे स्तुत्य उपक्रम घेऊन महिलांनाही या प्रवाहात आणण्याचे काम या युवा प्रतिष्ठान मार्फत केले जात आहे. खासदार सुनील तटकरे युवा प्रतिष्ठानचे नेहमीच लोकाभिमुख कार्यक्रम हाती घेऊन ते तळागाळापर्यंत लोकांपर्यंत पोहोचविले आहेत. खासदार सुनील तटकरे, माजी मंत्री माननीय आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांनी सातत्याने जनमानसापर्यंत पोहोचून आपली संस्कृती कला जोपासताना कलाकारांना प्रोत्साहन दिलेले आहे. त्यामुळे आज अनेक ग्रामीण भागातून गणपती सणादरम्यान असे बालेनाच अर्थातच नात्यांचे कार्यक्रम पहावयास मिळत आहेत.

आज ज्या तळा तालुक्यातील नाच मंडळींनी या कार्यक्रमास सहभाग घेतला होता. त्या प्रत्येक नाच मंडळास प्रोत्साहन म्हणून ५००० रुपये रोख, एक ढोलकी, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन खासदार सुनील तटकरे यांनी सन्मानित करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी लोकप्रिय खासदार सुनील तटकरे, तळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अध्यक्ष नाना भौड, तळे तालुका राष्ट्रवादी काँग्रेस महिला अध्यक्ष सौ जानवी शिंदे, तळे नगराध्यक्ष सौ अस्मिता भोरावकर, रायगड जिल्हा अल्पसंख्यांक अध्यक्ष अँड उत्तम जाधव, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, वसंत भोई, वसंत शेठ लोखंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य बबन चाचले, माजी उपसभापती गणेश वाघमारे, तळा शहर महिला अध्यक्ष आघाडी प्रमुख सौ मेघा सुतार, नगरसेविका रेशमा बामणे, अर्चना तांबे, माधुरी घोलप, नगरसेवक मंगेश शिगवण, अविनाश पिसाळ, तळे तालुका राष्ट्रवादी काँग्रेस माजी अध्यक्ष नथुराम अडखळे, शहर प्रमुख महेंद्र कजबजे, नागेश लोखंडे, सचिन कदम, विठोबा साबळे, शैलेश घोलप, मंगेश भगत, किशोर शिंदे, जगदीश शिंदे, माजी सरपंच महादेव गोळे, परशुराम वरंडे, विजय तांबे, कृष्णा चाळके या राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी जेष्ठ श्रेष्ठ कार्यकर्ते व रसिकजन फार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम अतिशय शिस्तबद्ध उत्साही वातावरणात सुंदरपणे यशस्वीरित्या पार पडला. सर्वच कार्यकर्त्यांनी यासाठी परिश्रम घेतले.

# नैसर्गिक शेती करा, देशासह आपणही सुजलाम् सुफलाम् सुदृढ होऊ या : माधुरी देशपांडे

**दै.रायगड नगरी । रोहा**

रासायनिक शेतीला पारंपारिक समजणे दिवसेंदिवस घातक ठरत आहे. रासायनिक किटकनाशके, खतांच्या वाढत्या प्रमाणाने मातीचा दर्जा खालावत आहे. नदी, नाले, समुद्र यांसह पूर्णतः पर्यावरण बिघडत आहे. तापमानत मोठी वाढ झाली, हे वेळीच न थांबवल्यास जगाला धोका आहे. त्यासाठी आपल्या नैसर्गिक शेतीकडे वळा, कॅन्सर व अन्य भयानक आजारापासून दूर रहा, नैसर्गिक शेती करा, देशासह आपणही सुजलाम् सुफलाम्, सुदृढ होऊ या असे मौलिक आवाहन स्किल विकास फाउंडेशनच्या प्रमुख, कृषी अभ्यासक माधुरी देशपांडे यांनी केले आहे.

रोहा येथील शासकीय विश्रामगृह सभागृहात रोहा तालुका शेतकरी विकास प्रतिष्ठान व स्किल विकास फाउंडेशन आयोजित माती विज्ञान आणि नैसर्गिक फायदेशीर शेती विषयांवरील मार्गदर्शनावर कार्यक्रमात त्या बोलत होत्या. त्यावेळी शेतकरी विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश भगत, खजिनदार धनंजय जोशी, संचालक विनोद पाटील, दगडू बामुगडे, खेळू थिटे, उमेश पाटील, संतोष दिवकर, विजय दिवकर व शेतकरी बांधव उपस्थित होते. शेती ही बहुतांश रासायनिक अनैसर्गिक घटकांनी होत आहे. यातून आपण निसर्ग, जैव चक्रावर अत्याचार करीत आहोत. रासायनिक खते, कीटकनाशके आरोग्य, माती सर्वच घटकांवर परिणाम करत आलेय, त्यामुळे शेती पद्धतीत वेळीच बदल करणे गरजेचे आहे असे सांगत तज्ञ माधुरी देशपांडे यांनी डिजिटल माहितीद्वारे शेती काल आणि आजची समजावून सांगितली. भाजणी, गवत बाहेर फेकणे हे अज्ञानपणाचे आहे. तेच गवत गादी करावी, त्यावर जीवामृत टाकावे, त्यामुळे मातीचा दर्जा सुधारतो. गांडूळ तयार होतात. दुसरीकडे लाल मुंगी, खेकडा, वाळवी हेही



आपले मित्रच आहेत. प्रत्येकजण आपापली कामे करतात अशी विविध गैरसमज दूर करून माधवी देशपांडे यांनी उपस्थित प्रगत शेतकऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. नैसर्गिक शेतीचे तंत्रज्ञान आपल्या पिढीला व पुढच्या पिढीपर्यंत पोहचवायचे आहे. सुभाष पाळेकर यांच्या कृषी तंत्रज्ञानावर करीत असलेल्या प्रयत्नाना खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे शेतकरी तंत्रज्ञानाचा अवलंब करीत आहेत असे कृषी विचार व्यक्त झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष गणेश भगत यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी विकास प्रतिष्ठानचे पदाधिकारी, सदस्यांनी विशेष परिभ्रमण घेतले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## उरणजवळ बस-कार धडक ; १ जखमी

उपचारासाठी रुग्णालयात दाखल करुन घेतले आहे.

सदर अपघात हा गुरुवार दि२२ सप्टेंबर रोजी सकाळी ठिक ६-१५ च्या सुमारास घडला असून एन एम एम टी बस गाडीतून नोकरदार वर्ग तसेच इतर प्रवासी प्रवास करत असल्याचे सांगण्यात येत आहे.या अपघाता संदर्भात न्हावा शेवा पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भेट यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी अधिक माहिती घेत आहेत.

## पनवेल तालुका पोलीस स्थानकाचे वतीने मार्गदर्शनपर बैठक संपन्न

नवरात्रौत्सव मंडळ परिसरात सुरक्षेच्या दृष्टीकोनातून नियंत्रण ठेवण्यासाठी सी.सी.टी.व्ही.कॅमेरे लावण्यात यावेत. महीला व पुरूष यांना दर्शनासाठी वेगवेगळ्या रांगेत दर्शनाची सोय करावी. नवरात्रौत्सव साजरा करीत असलेल्या ठिकाणी आपत्कालीन परिस्थितीमध्ये उपयोगात आणण्यासाठी जनरेटर, फायर फायटर, इत्यादी अत्यावश्यक साधनसामग्री ठेवण्यात यावी. मार्गदर्शन करताना पाटील पुढे म्हणाले की नवरात्रौत्सवानिमित्त सार्वजनिक रस्त्यावर/चौकामध्ये/स्थानिक स्वराज्य संस्थांचे जागेवर वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे व विद्रूप करणारे फ्लेक्स/बोर्डस्/बॅनर्स इत्यादी उभारण्यात येवू नये. विसर्जनावेळी नदी पत्रात ज्यांना पोहोता येत नाही अशांना नदी पात्रात उतरू देऊ नका त्यांच्याऐवजी स्वयंसेवक यांच्या मार्फत देवी मूर्तीचे विसर्जन करून घेणे.यावेळी नवरात्रौत्सव सणाचे अनुषंगाने इतर महत्वाच्या सुचना देवून मार्गदर्शन करण्यात आले. पनवेल तालुका पोलीस स्थानकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांच्या पुढाकाराने आणि पोलीस उप आयुक्त शिवराज पाटील पोलीस सह आयुक्त भागवत सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर बैठकीच्या आयोजनाबद्दल सार्वजनिक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले.

# मतदार ओळखपत्रासोबत आधारकार्ड जोडू ; मतदार यादीतील स्वत:ची ओळख प्रमाणित करू

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार दि.१ ऑगस्ट २०२२ पासून सर्व मतदारांना आपल्या मतदार ओळखपत्रासोबत आधारकार्ड संलग्न करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखालील रायगड जिल्ह्यातील मतदारांची मतदार ओळखपत्रासोबत आधार जोडणी करण्यासाठी जिल्हा अंतर्गत विविध उपक्रम व विशेष शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत.

तसेच जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांनी जिल्ह्यातील सर्व हौसिंग सोसायटीमध्ये आधारकार्ड मतदार कार्डसोबत लिंक करणे यासाठी शिबिराचे आयोजन करण्यासाठी हौसिंग सोसायटीमधील नागरिकांना आवाहन केले आहे.

ज्या नागरिकांना आपल्या हौसिंग सोसायटीमध्ये आधार जोडणी शिबीर आयोजित करावयाचे आहे त्यांनी आपल्या जवळील मतदार नोंदणी कार्यालय (तहसील/ उपविभागीय अधिकारी कार्यालय) येथे संपर्क साधावा.

कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक:- १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघ- ०२२-२७४५२३२८ / ०२२-२७४६९१३४, १८९ कर्जत विधानसभा मतदारसंघ- ०२१४८-२२३४९९, १९० उरण विधानसभा मतदारसंघ- ०२२-२७२२२१२९, १९१ पेण विधानसभा मतदारसंघ- ०२१४३-२५३०००, १९२ अलिबाग विधानसभा मतदारसंघ- ०२१४१-२२४४३४, १९३ श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघ- ०२१४७-२२२४३५, १९४ महाड विधानसभा मतदारसंघ- ०२१४५-२२२१३६

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## वावंजे रस्त्याबाबत शिवसेना आक्रमक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपलिका हद्दीतील वावंजे रस्ता (गोडा आंबा) येथे रस्त्यावर साचलेल्या पाण्याबद्दल व नाळयाची साफसफाई करून नवीन नाळयाचे बांधकाम करण्यासंदर्भात शिवसेनेचे तालुका प्रमुख विश्वास पेटकर यांनी महापालिकेचे प्रभाग २ प्रभाग अधिकारी यांना निवेदन दिले.

यावेळी त्यांच्या समवेत उप तालुका प्रमुख शांताराम कुंभारकर, रामलखन प्रसाद, परशुराम गायकर, आर. के. पटेल, किसमत अली, विष्णुशंकर पांडे, अंकित सिंह, मोहम्मद उमर यांच्यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते. वावंजे (गोडाआंबा) येथील महानगरपालिका क्षेत्रातील हद्दीमध्ये रस्त्यावर पाणी, नाळे उघडे सर्व काही घाणीचे सम्राज्य आहे. त्यामुळे तेथे व्यवसाय करणा-या नागरीकांना मोठा त्रास सहन करावा लागतो.

त्यामुळे याची आपण तातडीने दखल घेऊन रस्त्यावर साचलेले पाणी, नाळ्याची साफसफाई करून नवीन नाळयाचे बांधकाम करावे व नागरीकांना होणा-या त्रासापासून मुक्तता करावी, असेही या निवेदनात अधोरेखित केले आहे.

# रोह्यात गुरांवरील लंपी आजाराने केला शिरकाव

## सुतारवाडी परिसरामध्ये तीन गुरांना लक्षणे, प्रशासन सतर्क

**दै.रायगड नगरी । रोहा**



रोहा तालुक्यातील सुतारवाडी परिसरामध्ये तीन जनावरांना लंपी आजाराचे लक्षणे दिसत असल्याची माहिती तालुका पशुसंवर्धन विभागाकडून देण्यात आली. त्यात आंबिवली येथील रामचंद्र सखाराम सपकाळ यांची एक गाय व दुरडोली येथील रामदास रामचंद्र किरजन यांची एक गायी व दोन महिन्याचा एक वासरू यांना लागण झालेले आहे. त्यामुळे रोहा तालुक्यातील पशुंपालकामध्ये चिंतेचे वा-तावरण पसरले आहे मात्र प्रशासनाने वेळीच खबरदारी घेऊन गुरांवर योग्य ते उपचार करण्यात आलेले आहेत. तिन्ही जनावरांची प्रकृती उत्तम आहे अशी माहिती तालुका पशुवैद्यकीय अधिकारी यांनी दिली.

दरम्यान १७ तारखेला सायंकाळी साडेसात वाजता सुतारवाडी परिसरातील पशुंपालकांनी परिसरातील पशुवैद्यकीय डॉक्टरांकडे गुरावरील लंपी आजाराची लक्षणे दिसत असल्याची तक्रार केली. तात्काळ विभागीय डॉक्टरांनी तालुका पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याकडे माहिती पुरविण्यात आली. १८ तारखेला सकाळी तालुका पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी तेथील परिस्थिती चा आढावा घेऊन तातडीने त्या गुरांचे रक्ताचे नमुने व नाकातील स्त्रा-वाचे नमुने पुणे येथील पुढील तपास करता पाठवण्यात आले आहेत.

तसेच रायगड जिल्हा पशुसंवर्धन उपाय अधिकारी व रोहा तहसीलदार यांच्या निर्दे शानुसार परिसरातमधील ज्या गावा पासुन पुढील पाच किलोमीटर अंतरावरील सर्व गुरांचे लसीकरण करुन घ्यावे या नुसार परिसरातील पाच किलोमीटर अंतराआतील सर्व गुरांचे लसीकरण करण्यात आलेले आहे. तर आतापर्यंत एकूण १३७० जनावरांच्या लस देण्यात आली आहे. हा आजार गोचडी, कींड, माशा यामुळे पसरण्याची दाट शक्यता आहे. खबरदारी म्हणून पशुसंवर्धन विभागामार्फत रोजच्या रोज परिसरामध्ये फवारणी व ग्रामपंचायतीमार्फत परिसरामध्ये रोजच्या रोज खबरदारी घेण्यासाठी असणाऱ्या उपयोजनाची दवंडी देण्यात येत आहे अशी माहिती तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉक्टर अक्षय सांगले यांनी दिली.

> रोहा तालुक्यातील जनावरांमध्ये लंपी आजाराची काही लक्षणे आढळल्यास थेट १९६२ या जिल्हा टोल फ्री क्रमांकावर कॉल करावा तसेच त्या गुरांना क्वारंटाईन करून तात्काळ पशुवैद्यकीय अधिकारी यांना माहिती कळवावी.
>
> **- शुभदा पाटील, रोहा पंचायत समिती गटविकास अधिकारी**

# जासई विद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील जयंती संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील जासई येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज जासई विद्यालयात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक थोर शिक्षणतज्ञ, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यातआली.



शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष व कामगार नेते सुरेश पाटील विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे, विद्यालयाचे मुख्याध्यापक, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग आणि इतर मान्यवर यांच्या शुभहस्ते फुलांनी सजविलेल्या कर्मवीरांच्या पालखीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर पालखी जासई गावात फिरविण्यात आली. गावातील सुहासिनींनी दारोदारी पालखीची पूजा करून कर्मवीरांचे आशीर्वाद घेतले. विशेष म्हणजे या पालखीच्या पुढे विद्यालयाचे बँड पथक, लेझीम पथक आणि संपूर्ण विद्यार्थी पालखी घेऊन विद्यालयाच्या प्रांगणात माघारी आल्या नंतर रयत गीत व रयत माऊली गीत झाले. याप्रसंगी विद्यालयामार्फत सर्व विद्यार्थ्यांना खाऊ म्हणून वाटण्यात आले. या सोहळ्यासाठी ग्रामपंचायत जासई सरपंच संतोष घरत, उरण पंचायत समितीचे माजी सभापती नरेश घरत, विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य गोपीनाथ ठाकूर, अमृत ठाकूर, प्रभाकर मुंबईकर, यशवंत घरत, शाळा व्यवस्थापन व विकास समितीच्या सदस्या सौ. मनिषा घरत तसेच इतर शिक्षण प्रेमी नागरिक आणि पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.पालखी सोहळ्याच्या नियोजनामध्ये महाराष्ट्र रयत सेवक संघाचे समन्वयक व ज्येष्ठ शिक्षक नुरा शेख विद्यालयातील गुरुकुल विभाग प्रमुख जी.आर म्हात्रे ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख शिंदे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.

# कामोठे स्मशानातील अंत्यविधीला कोरड!

## पाणीच नसल्याने मृतांच्या नातेवाईकांची गैरसोय ; सिडको मनपाच्या असमन्वयाचा परिपाक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे वसाहतीमध्ये इतर अनेक समस्या आणि प्रश्न आहेतच. त्याचबरोबर स्मशानभूमीत मरणोत्तर यातना सहन कराव्या लागत आहे. या ठिकाणी पाणी नसल्याने मृतांच्या नातेवाईकांना गैरसोय ला सामोरे जावे लागत आहे. सिडको आणि पनवेल महानगरपालिकेचा समन्वय नसल्याने अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. याबाबत त्वरित उपाययोजना करण्याची मागणी शिवसेना शिंदे गटाकडून करण्यात आली आहे.



कामोठे वसाहतीची लोकवस्ती मोठी आहे. दिवसेंदिवस त्यामध्ये आणखी भर पडत आहे. दोन रेल्वे स्थानक आणि पनवेल सायन महामार्गालगत असणाऱ्या कामोठे कॉलनीमध्ये कनेक्टिव्हिटी मुळे सहाजिकच लोकसंख्या अधिक आहे. त्यामुळे नैसर्गिक व अपघाती मृत्यूंची संख्या सुद्धा जास्त आहे.परिणामी वसाहतीतील स्मशान भूमी मध्ये अंत्यविधीसाठी येणाऱ्या मृतदेहांचे प्रमाण सुद्धा जास्त आहे. ही स्मशानभूमी सिडकोने पनवेल महानगरपालिकेला हस्तांतरित केलेली आहे. असले तरी या ठिकाणी सुविधांचा वानवा आहे. अनेक गोष्टींची कमतरता स्मशानात जाणवते. गेल्या काही महिन्यांपासून कामोठे येथील या स्मशानभूमीत पाणी नसल्याची माहिती पुढे आली आहे. अंत्यविधीसाठी पाण्याची अत्यंत आवश्यकता असते. त्याचबरोबर मृतांच्या नातेवाईकांना हातपाय धुण्यासाठी, तसेच केस कर्तनाच्या अगोदर आणि नंतर आंघोळ करावी लागते. त्याचबरोबर शौचालय आणि स्वच्छतागृहातही पाणी नसल्याने अंत्यविधीसाठी येणाऱ्या मृतांच्या नातेवाईकांची कुचंबणा होत आहे स्मशानभूमी महानगरपालिकेकडे हस्तांतरित केली असली तरी पाणीपुरवठा मात्र सिडकोकडूनच केला जातो. परंतु याठिकाणी पाणीच नसल्याने मृतांच्या नातेवाईकांना गैरसोयींना सामोरे जावे लागते. परिणामी कामोठेकरांना मरणोत्तर यातना सहन कराव्या लागतात. यासंदर्भात शिंदे गटाने महापालिका आणि सरकारचे लक्ष वेधले आहे. याबाबत त्वरित उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी अर्जुन डांगे यांनी केलेली आहे.

मा.गोडसे सो

**अर्जदारतर्फे वकील**
**ॲड.प्रदीप एस. सावंत**

**जाहीर नोटीस**

मे.दिवाणी न्यायालय क./व.स्तर सो.पनवेल यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१३७८/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०७/११/२०२२

१) श्रीमती.मानिनी अरुण पडवळ
व.वर्षे ७०, धंदा : गृहिणी
२) श्री.पंकज अरुण पडवळ
व.व.४४, धंदा : नोकरी
नं.१ व २ दोघेही रा.नील हेरंभ, बी-दुसरा मजला, शिवाजी रोड, लाईन आळी, पनवेल ४१०२०६
३) सौ.शितल राहूल औसेकर
व.व.२२, धंदा : गृहिणी
रा.एस/एन २, भूखंड नं.१५, महावीर नगर, विद्याधन हाऊस नं.१३१, वडगाव शेरी, पुणे ४११०१४ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही जाबदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी, सामाईक मालक कै.अरुण गोपाळ पडवळ हे दि.२४/०८/२०२२ रोजी त्यांच्या राहत्या घरी म्हणजेच रा.नील हेरंभ, बी-दुसरा मजला, शिवाजी रोड, लाईन आळी, पनवेल ४१०२०६, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच कै.अरुण गोपाळ पडवळ यांची आई कै.शामला गोपाळ पडवळ ही दि.३१/०३/२००२ रोजी पनवेल येथे मयत झालेली आहे. त्याअर्थी अर्जदार १) श्रीमती.मानिनी अरुण पडवळ, २) श्री.पंकज अरुण पडवळ नं.१ व २ दोघेही रा.नील हेरंभ, बी-दुसरा मजला, शिवाजी रोड, लाईन आळी, पनवेल ४१०२०६, ३) सौ. शितल राहूल औसेकर रा.एस/एन २, भूखंड नं.१५, महावीर नगर, विद्याधन हाऊस नं.१३१, वडगाव शेरी, पुणे ४११०१४ यांनी खालील वर्णनाच्या संपादीत शेतजमीन मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

श्री.शिवाजी गोपाळ पडवळ व इतर ९ यांची मौजे वडघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील सामाईक मालकी हक्क व प्रत्यक्ष ताबे-कब्जे वहिवाटीत असलेली शेतजमीन मिळकत महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी संपादीत केलेली आहे. सदर संपादीत शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**संपादीत शेतजमीन मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) |
|---|---|---|
| मौजे : वडघर | ६३/१ अ | ०.३६.५ |
| | ६३/२ अ | ०.३०.० |
| | ६३/४ | ०.०९.० |

येणेप्रमाणे संपादीत शेतजमीन मिळकतीचे वर्णन असे.

वर नमूद संपादीत शेतजमीन मिळकतीच्या संपादनापोटी महाराष्ट्र शासनाच्या दि.०१/०३/२०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार श्री.शिवाजी गोपाळ पडवळ व इतर ९ यांचे नावे सिडको महामंडळाकडून पुनःस्थापना योजनेनुसार दि.२५/११/२०१६ रोजीच्या वाटपपत्रानुसार खालीलप्रमाणे भूखंड वाटप करण्यात आलेला आहे.

**भूखंड वाटपाचा तपशिल**

| संचिका नं. | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| VAD-4/3494 | पुष्पकनगर (दापोली) | ४ | १७ | ११९० |

येणेप्रमाणे भूखंड वाटपाचा तपशिल असे.

वरील अर्जदार हे मयत कै.अरुण गोपाळ पडवळ यांचे वारस आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जाकामी पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि जर अर्जदार हे कै.अरुण गोपाळ पडवळ यांचे वारस असल्याचे शाबित झाले तर त्यांस वारसदाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि.२२/०९/२०२२ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# देवीची मूर्ती साकारण्यात मुर्तीकार झाले मग्न

**दै.रायगड नगरी । उरण**

नवरात्रोत्सव ( दि. २६ ) पासून सुरु होणार असून घटस्थापना सोमवारी होणार आहे त्या मुळेदेवीच्या मूर्ती बनविणाऱ्या कारखान्यात कारागीर कामात मग्न झाले आहेत. कोरोना संकटानंतर प्रथमच गणेशोत्सवानंतर नवरात्रोत्सव निर्बंधमुक्त होणार असल्याने भक्तांनी विशेषतः महिला वर्गाने तयारीवर भर दिला आहे. खरेदीसाठी महिलांची बाजारात लगबग सुरू आहे. साड्या आणि ड्रेस खरेदीसाठी झुंबड उडालेली दिसून येत आहे. अनेक मंडळांची मूर्ती ठरवण्यापासून ते अन्य तयारीसाठी कार्यकर्ते कामाला लागले आहेत. मूर्तिकामासाठी उरण तालुक्यातील चिरनेर, उरण, करंजा, मुळेखंड, सोनारी, बोकडवीरा, बांधीलवाडी आदी ठिकाणी मूर्ती कारखान्यात लगबग सुरू झाली आहे. नवरात्रोत्सव मंडळांच्या ऑर्डरप्रमाणे दुर्गामातेची विविध रूपे साकारण्यात मूर्तिकार व्यस्त झाले आहेत. देवीची मूर्ती साकारण्यात मूर्तिकार झाले मग्न झाले आहेत.



पावसाने हजेरी लावली आहे. त्याचा फटका मूर्तिकारांना बसत असून मूर्तीकाम व रंगकामात अडथळा येत आहे. सध्या बहुतांश मूर्तीच्या फिनिशींग, तसेच रंगकामाची लगबग सुरु आहे. रंगाचा पहिला हात मारून तो सुकल्यावरच मागील काही दिवसांपासून परतीच्या पावसाने थैमान घातले आहे. जिल्ह्यात ठिकठिकाणी ढगफुटीसह मुसळधार पाऊस सुरु आहे अखेरचा हात मारला जातो, मात्र वातावरणातील बदलामुळे अचानक मुसळधार पाऊस पडत आहे. परिणामी सुकण्यासाठी ठेवलेल्या मूर्ती पुन्हा प्लास्टिकच्या आवरणात ठेवाव्या लागत असल्याने मूर्तिकारांची धांदल उडत आहे. मूर्तिकामाला वेग आला असून मूर्तीला सजविन्याकडे लक्ष कारागिरांचे लागले आहे मृतींच्या चेहर्याविरील भाव, डोळ्यातील तेज या गोष्टींसाठी मूर्तिकाराचे कसब कामी येत आहे. मूर्तीचे फिनिशिंग करणे, रंगरंगोटी करणे, सुशोभीकरण व अलंकारासाठी मोतीकाम करणे आदि कामासाठी उरण तालुक्यातील सह शहारातील मूर्ती कारखान्यात लगबग सुरु झाली आहे. नवरात्रोत्सव सुरु होण्यास फक्त थोडेच दिवस उरल्याने देवी मातेच्या मूर्तिकामाला वेग आला आहे. मूर्तीच्या रंगकामासह इतर बारीक सारीक गोष्टीकडे आवर्जून लक्ष द्यावे लागत असल्याने कारागीर सहकुटुंब रात्रंदिवस कार्यशाळेत राबू लागले आहे. त्यांच्या मूर्तिकलेच्या नैपुण्यामुळेच मातेच्या विविध रूपामध्ये जिवंतपणा येणार आहे. आला महिला वर्गात नवरात्रीच्या रंगांची उत्सुकता लागली आहे.

नवरात्रोत्सव म्हणजे महिलांच्या जिव्हाळ्याचा विषय असतो. नवरात्रोत्सवातील देवीची उपासना, धार्मिक कार्यापासून विसर्जनापर्यंत अनेक जबाबदार्या महिला पार पडतात. घरोघरी होणार्याय घटस्थापनेतही महिलांच पुढाकार घेतात. त्याचबरोबर प्रत्येक वारानुसार शुभ असलेल्या रंगाचीच साडी देवी नेस-वली जाते असून रंगाचे अनुकरण महिलाही करतात. त्यामुळे नवरंगातील साड्या व ड्रेस खरेदी केली जाते. नवरात्रोत्सव जवळ आल्याने महिलांमध्ये नवरंगाची उत्सुकता वाढली आहे. बाजारपेठेही नवरात्रीच्या पार्श्वभूमीवर सज्ज होऊ लागली

# अभिनव ज्ञान मंदिर महाविद्यालयाच्या कृणाल चौधरी तालवाद्य स्पर्धेत तृतीय क्रमांक

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत मधील अभिनव ज्ञान मंदिर महाविद्यालयाच्या कृणाल चौधरी या विद्यार्थ्याचा मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवातील तालवाद्य स्पर्धेत विद्यापीठ स्तरावरील अंतिम फेरीत तृतीय क्रमांक आला आहे.



मुंबई विद्यापीठाच्या ५५ व्या आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवानिमित्त विभाग क्रमांक ०७ (उत्तर रायगड) मध्ये कावसजी जहांगीर दिक्षांत सभागृह, मुंबई विद्यापीठ येथील तालवाद्य स्पर्धे ची अंतिम फेरी पार पडली. या स्पर्धेमध्ये अभिनव ज्ञान मंदिर कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय कर्जत रायगड मधील प्रथम वर्ष कला शाखेतील कृणाल चौधरी या विद्यार्थ्यास तृतीय क्रमांक मिळाला. ऑगस्ट महिन्यात झालेल्या मुंबई विद्यापीठाच्या विभागीय झोन क्रमांक ०७ उत्तर रायगड मध्ये त्याने तृतीय क्रमांक पटकावला आणि त्यानंतर कृणाल हा विद्यापीठ स्तरावरील अंतिम फेरीत सादरीकरण करण्यासाठी पात्र झाला होता.

कृणाल याने वाद्यवादनाचे शिक्षण गेले आठ वर्ष कर्जत देऊळवाडी येथील गुरुवर्य मंगेश बुवा बेडेकर यांच्याकडे घेतले आहे. शास्त्रीय पखवाज वादनामध्ये त्याचे मध्यमा प्रथम पर्यंत शिक्षण झालेले आहे. तसेच अभिनव ज्ञान मंदिर प्रशालेचे संगीत शिक्षक सौरभ हिवरेकर यांनी देखील त्याला मार्गदर्शन केले.

अभिनव ज्ञान मंदिर वरिष्ठ महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. शिल्पा भुसारी यांनी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागातर्फे त्याला स्पर्धेसाठी मार्गदर्शन केले. तसेच सांस्कृतिक विभाग विद्यार्थी प्रमुख आदित्य पवार आणि विद्या वांजळे यांनी या युथ फेस्टिवल मधील विविध सांस्कृतिक उपक्रमांकरीता सर्व विद्यार्थ्यांना सोबत घेऊन अतिशय उत्तम असे सादरीकरण युवा महोत्सवामध्ये केले.

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीद्वारे माझे पक्षकाराचे वतीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, मुळ भूखंड मालक श्री.हरिभाऊ पिलाजी तारेकर यांचे ताबा कब्जात व वहिवाटीत नोड-पुष्पकनगर/दापोली, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाचा भूखंड आहे. त्या भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे

**भूखंडाचे वाटप**
**नोड : पुष्पकनगर/दापोली, ता.पनवेल, जि.रायगड**

| नोड | संचिका क्र. | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| पुष्पकनगर/ दापोली | पारगाव-९७ | ७ | ४२ अे | ८१० चौ.मी. |

सदर वरील भूखंड आमचे पक्षकार श्री.हरिभाऊ पिलाजी तारेकर यांचे नावे असून, आमचे पक्षकार श्री.हरिभाऊ पिलाजी तारेकर यांनी वर वर्णन केलेल्या भूखंड आमचे पक्षकाराचे मुलगे १) श्री.राजेश हरिभाऊ तारेकर, २) श्री.संजय हरिभाऊ तारेकर यांना बक्षिस पत्राद्वारे द्यावयाचे ठरविलेले आहे. तरी सदरहू भूखंडावर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री, पुराव्यासह खालील सही करणार वकीलांच्या पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर भूखंड निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर भूखंडाचे बक्षिसपत्राचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.२२/०९/२०२२

**सही/-**
**ॲड.संगम राम घरत**
**पत्ता : रा.पो.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६**
**मो.नं.९९२०७००७०८**

**जाहीर नोटीस**

प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, १) श्री.राजू गणपत खानेकर व २) सौ.सुनिता राजू खानेकर, मौजे : दिवे-आगर, ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथील गावठाण सर्व्हे क्र.३/१ क, पैकी सामाईक ८ अ खाते क्र.२१६९, धारणाधिकार-भोगवटादार वर्ग १, ज्याचे एकूण बिनशेती क्षेत्र ०-०१-५० (हे.आर.पॉ.) + पोटखराबा क्षेत्र ०-००-०० (हे.आर.पॉ.) = पैकी विक्री पुरते क्षेत्र ०-०१-०० (हे.आर.पॉ.) व एकूण आकार रु.१०=०० पैसे, म्हणजेच १००=०० चौ.मीटर्स मात्र इतक्या क्षेत्रफळाच्या बिनशेती भूखंड मिळकतीवरील ग्रामपंचायत एकमजली घर ईमला मिळकत क्र.६८२/१ व ६८२/३ व त्यावरील बिनशेती भूखंड मिळकत ही आमचे अशिल कायम खुषखरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर घर ईमला बिनशेती भूखंड मिळकतीचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही बोजा, हक्क, हितसंबंध, दान, तारण, गहाण, बक्षिस, फरोक्त, अन्न, वस्त्र, दिवाबत्ती, पोटगी, जमीन, वहिवाट, विश्वस्त, कुळमुखत्यार, विकसनकरार, बांधकामकरार, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, मृत्यूपत्र, इजमेंट, वारसाहक्क, बयाणा, तबदील या अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत खाली सही करणार वकील यांचेकडे योग्य त्या सर्व मुळ कागदपत्रे व पुराव्यांसह लेखी हरकती दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत लेखी हरकती व पुरावे न आल्यास वरील घर ईमला व बिनशेती भूखंड मिळकत ही निर्वेध व निर्जोखमी आहे, असे गृहीत धरुन आमचे अशिल सदर घर ईमला व बिनशेती भूखंड मिळकतीच्या उपरोक्त मालकांसोबत ''खरेदीचा'' व्यवहार पूर्ण करतील तसेच सदर नोटीसीच्या विरुद्ध वर्तमान पत्रातील छापलेल्या जाहीर हरकती व सुचना तसेच मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही सुचना व हरकती, माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

दि.२२/०९/२०२२

**सही/-**
**ॲड.श्री.सचिन मा.कल्याणकर**
**प्लॉट क्र.१४२/अे, पहिला मजला, मिडलक्लास हौ.सो.लि., युनियन बँकेच्या वर, गांधी हॉस्पिटलच्या बाजूला, सुरुची हॉटेल समोर, मुंबई पुणे हायवे, पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.क्र.९७६८३६६७१४/९८७०९८६१३५**

# संक्षिप्त...

## उरण मध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । उरण**

टाटा हॉस्पिटल व खारघर ब्लड बँक यांच्या सहकार्याने कोकण ज्ञानपीठ, उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, लायन्स क्लब उरण, मी उरणकर सामाजीक व सांस्कृतीक संस्था उरण, माजी विद्यार्थी संघ, उरण महाविद्यालय, छत्रपती शिवाजी महाराज सामाजीक संस्था उरण, वूमन ऑफ विसडम शैक्षणिक व सामाजिक संस्था उरण,टायगर ग्रुप उरण यांच्या संयुक्त विद्यमाने कोकण ज्ञानपीठ, उरण वाणिज्य व कला महाविद्यालय, तहसील कार्यालय समोर, उरण शहर येथे मंगळवार दि. २७/०९/२०२२ रोजी सकाळी ९.०० ते दुपारी २.०० या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

दरवर्षी महाविद्यालयाच्या माध्यमातून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. याही वर्षी जास्तीत जास्त रक्तदात्यांनी या शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

सर्व प्रकारच्या जाहिरातींचे उत्तम माध्यम
दैनिक रायगड नगरी
9619979706 / 9619737911

### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# पनवेल शहर जिल्हा काँग्रेसची गाडी रुळावर

## प्रदेश काँग्रेसकडून पनवेलला पक्षवाढीसाठी वाहन सुपूर्द



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कार्यक्षेत्रात पक्षसंघटना मजबूत व्हावी व पदाधिकारी, कार्यकर्त्यांना पक्षासंबंधीत कार्यक्रमांना ये-जा करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्यावतीने आज (गुरुवार दि.२२ सप्टेंबर) एक महिंद्रा कंपनीची स्कॉर्पिओ कार भेट देण्यात आली आहे. पनवेल परिसरात अनेक लहानमोठ्या वाड्या वस्त्या आहेत. त्यामुळे अनेकदा सर्वसामान्य कार्यकर्त्यांना सभेला, कार्यक्रमाला जाण्यासाठी वाहन उपलब्ध होत नाही. अशावेळी पक्षातील जेष्ठ नागरिक, महिला, सर्वसामान्य कार्यकर्त्यांना हे वाहन अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास पनवेल शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी व्यक्त केला आहे. यावेळी जेष्ठ नेते डॉ. भक्तीकुमार दवे, प्रताप गावंड व पनवेल युवक अध्यक्ष राकेश यादव उपस्थित होते.

मागील काही काळापासून अडथळ्यांची शर्यत पार करत मार्गक्रमण करणाऱ्या पनवेल शहर जिल्हा काँग्रेसने पुन्हा एकदा पनवेलच्या राजकारणात कमबॅक केले आहे. पनवेल शहर जिल्हा काँग्रेसची सूत्रे नुकतीच अभिजित पां पाटील यांनी हाती घेताच विविध उपक्रम राबविले जात आहेत. काँग्रेस पक्षाला पनवेलमध्ये गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी कार्यकर्त्यांची भक्कम मोट बांधण्यासाठी नवनिर्वाचित अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली कसोशीने प्रयत्न केले जात आहेत. यासाठी पक्षाच्या आजी माजी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन 'अभी हम जिंदा है' असे म्हणत पनवेल काँग्रेस आता आक्रमक भूमिकेत देखील पहायला मिळत आहे. त्यामुळे 'पनवेलची काँग्रेस संपली' अशी टीका करणाऱ्यांना वेळ आल्यावर जोरदार प्रत्युत्तर मिळेल, असा पलटवार पनवेल शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी केला आहे.


मुंबईतील दादर येथील टिळक भवन येथे वाहन स्विकारल्यानंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना अभिजीत पाटील म्हणाले, खरेतर हा आनंदाचा क्षण आहे. ऑगस्ट २०१५ मध्ये महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी काँग्रेसचे हात बळकट करण्यासाठी जिल्हा काँग्रेस कमिटीला एक नवीकोरी महिंद्रा स्कॉर्पिओ गाडी भेट दिली होती. त्यावेळी ही गाडी घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या वर्षा बंगल्यावर आम्ही उपस्थित होतो. आज हीच गाडी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने पनवेल काँग्रेसला पुन्हा सुपूर्द करण्यात आली. यामुळे पनवेल काँग्रेसला निश्चितपणे या वाहनाचा उपयोग होईल अशी खात्री आहे.

# अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयातून समिर पाटील यांची निर्दोष मुक्तता

**दै.रायगड नगरी । उरण**

पनवेल येथील मा. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश रायगड संतोष शिंदे यांच्या न्यायालयाने समीर पाटील (रा.चिर्ले, ता.उरण) यांची भा.द.कलम ३५३ च्या गुन्ह्यातून मंगळवार दि२०/९/२०२२ रोजी मुक्तता केली आहे. जेष्ठ वकील ॲड प्रमोद ठाकूर व ॲड किशोर पाटील यांनी जिल्हा सत्र न्यायालयात सेशन केस १३३/२०२१ अन्वये आरोपी तर्फे काम पाहिले.

ॲड किशोर ठाकूर यांच्या कडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार दि १९/८/ २०१९ च्या रात्रीच्या सुमारास उरण तालुक्यातील दास्तान फाटा ते दिघोडे येथील वेश्वी



(दादरपाडा) बस स्टॉप जवळील एम आय डी सीच्या पाईप लाईनला अज्ञात ट्रेलर वाहनाने धडक दिल्याची घटना घडली होती. या घटने संदर्भात चिर्ले गावातील रहिवासी समिर पाटील यांच्या विरोधात एम आय डी सीच्या पाईप लाईनचे नुकसान तसेच शासकीय अधिकाऱ्यांच्या कामात अडथळा निर्माण केला, म्हणून समिर पाटील यांच्या विरोधात उरण पोलीस ठाण्यात दि१९/८/२०१९ रोजी भा. दं वि कलम ३५३च्या नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पनवेल येथील मा.अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश रायगड संतोष शिंदे यांच्या समोर समिर पाटील यांच्या बाजूने सेशन केस १३३/२०२१ तर्फे जेष्ठ वकील ॲड प्रमोद ठाकूर व ॲड किशोर ठाकूर यांनी योग्य बाजू मांडली असता जिल्हा सत्र न्यायाधीशांनी सर्व हकीकत समजावून घेत समिर पाटील यांची सदर गुन्ह्यातून मंगळवार दि२०/९/२०२२ रोजी निर्दोष सुटका केली आहे. जेष्ठ वकील प्रमोद ठाकूर यांनी आरोपीतर्फे बचावाचे काम पाहिले. तर ॲड. किशोर ठाकूर व ॲड हृदयनाथ म्हात्रे यांनी त्यांना साहाय्य केले.

# अखेर नेरळ-कळंब मार्गावर एस टी सुरू विद्यार्थ्यांची व ग्रामस्थांची झाली सोय

**दै.रायगड नगरी । कर्जत**

नेरळ शहर आणि रेल्वे स्थानक येथे येणाऱ्या माथेरान-नेरळ-कळंब या राजमार्ग रस्त्यावरील कोल्हारे साई मंदिर ते धामोते या भागात रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण केले जात होते. गेले सहा महिने या रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या माध्यमातून केले जात आहे. अत्यंत संथगतीने रस्त्याचे होत होते. मात्र आता ते काम एस टी सुरू होण्या इतपत झाल्याने आज त्या मार्गावर एस टी बसच्या फेऱ्या सुरू झाल्याने विद्यार्थ्यांना तसेच त्या परिसरातील नोकरदार व ग्रामस्थांची चांगली सोय झाली आहे.

रस्त्याचे काम संथगतीने सुरु असताना ज्या भागात ९०० मीटर लांबीचा रस्ता सिमेंट काँक्रीटचा केला जात होता. रस्त्याच्या कामामुळे एसटी गाड्या बंद असल्याने विद्यार्थी, ग्रामस्थ, कामगार वर्गाला खासगी वाहनांतून प्रवास करावा लागत होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड बसत होता.

शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात एसटीमधून प्रवास करता येत असतो. मात्र विद्यार्थ्यांना आर्थिक भुर्दंड सहन



करावा लागत होता. त्यामुळे एसटी सुरू व्हावी अशी मागणी पालक, नोकरदार व ग्रामस्थांकडून होत होती. आगार व्यवस्थापक शंकर यादव यांनी रस्त्याची पाहणी केली परंतु प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न असल्याने त्यांनी रस्ता सुस्थितीत असेल तरच एसटी सुरू करता येईल. असे स्पष्टपणे सांगितले.

कळंब भागातील सामाजिक कार्यकर्ते दिनेश भोईर यांनी रस्त्याचे काम लवकर होण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा केला. त्यात त्यांना यश आले. नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर यांनी नेरळ व कळंब येथील रिक्षा स्टँड वरील रिक्षांमुळे एसटी ला अडथळा येऊ नये म्हणून रिक्षा चालक व मालकांना सूचना केल्या. त्यांनीही सहकार्याचे आश्वासन दिले. कळंब – नेरळ रस्त्यावरील एसटी बस दिनेश भोईर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून एसटी सुरू करण्यात आली. याप्रसंगी आगार व्यवस्थापक शंकर यादव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील शेमडे, निरंजन दवणे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक देवानंद मोरे, महादेव पालवे, लक्ष्मण पोसटे, नरेश बदे, चालक केशव आंधळे, वाहक रविंद्र पादिर आदी उपस्थित होते.

# शालेय विद्यार्थ्यांसाठी आगरदांडा एस टी सेवा सुरू करा : साकिब गजगे

## मुरुड आगारप्रमुख यांना दिले निवेदन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील आगरदांडा परीसरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी सकाळच्या वेळेत आगरदांडा –मुरुड एस टी सेवा सुरू करण्यात यावी. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते साकिब गजगे यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या मुरुड आगारप्रमुख वाकचौरे यांना एका निवेदनाद्वारे केली आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, आगरदांडा, खारआंबोली, शिघ्रे येथील अनेक विद्यार्थी अंजूमन हायस्कूल, ज्यु. कॉलेज व डिग्री कॉलेज येथे शिक्षण घेण्यासाठी नियमीत प्रवास करीत आहेत. आपल्या आगारातून सदर विद्यार्थ्यांना शासनाच्या नियमानुसार एस. टी. पास सवलत दिलेली आहे. तरी अंजूमन इस्लाम जंजिरा मुरुड आपले जवळ आगरदांडा वरुन सकाळी ७.४५ वाजता आगरदांडा – मुरुड व दुपारी १४.०० वाजता मुरुड आगरदांडा अशी एस. टी. बसची मागणी दि. ६/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अंजुमन इस्लाम संस्थेचे सचिव रहीम कबले यांनी केली होती. परंतू या पत्रावर आज दिड महिना होऊनही कोणती कार्यवाही करण्यांत आलेली दिसून येत नाही.

मुरुड आगरातून तळा कॉलेजला जाण्यासाठी सकाळी मुरुड तळा बस सकाळी ६.१५ वाजता सुरु करण्यांत आली आहे. त्यानंतर त्या विद्यार्थ्यांना आणण्यासाठी मुरुड तळा दुसरी फेरी मुरुडहून १०.१५ वाजता सुरु करण्यांत आली. तसेच सर. एस. एस. हायस्कूल मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सकाळी ११.०० वाजता नांदले मुरुड ही फेरी सुरु करण्यांत आलेली आहे. विद्यार्थ्यांचे नुकसान न होणेकामी आपण सुरु केलेल्या या एस.टी. सेवांबद्दल मी आपले अत्यंत आभार मानतो. परंतू अंजूमन इस्लाम मुरुड जंजिरा येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संस्थेचे पत्र देवूनसुध्दा आणि वारंवार तोंडी चर्चा करुन सुध्दा आपण आजतागायत विद्यार्थ्यांसाठी कोणतीही फेरी चालू केलेली नाही. विद्यार्थ्यांनी पासाचे पैसे भरुन त्यांना शाळा, कॉलेज भरण्याच्या व सुटण्याच्या वेळेत एस.टी. बस नसल्यामुळे नाईलाजास्तव खाजगी गाडीचे पैसे भरुन प्रवास करावा लागतो.

तरी आठ दिवसांत सकाळी आगदांडा मुरुड ७.४५ वाजता व दुपारी मुरुड आगरदांडा २.०० वाजता एस.टी. सेवा सुरु न केल्यास शैक्षणिक सत्र सुरु झाल्यापासून विद्यार्थ्यांनी आपलेकडून पैसे भरुन काढलेल्या पासाचे पैसे, (विद्यार्थ्यांना एस.टी.बस सेवा) न मिळाल्यामुळे परत मिळविण्याकरीता मला आपले विरोधात कन्झुमर कोर्टात दावा करावा लागेल. याची नोंद घ्यावी. त्याकामी होणाऱ्या परिणामाची सर्वस्वी जबाबदारी आपणांवर राहील.असे साकिब गजगे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले असून सदर निवेदनाच्या प्रती मुरुड तहसीलदार, पोलिस निरीक्षक यांना देण्यात आलेल्या आहेत.

# महाड एस.टी.आगारातून देवीभक्तांसाठी प्रतापगड बसच्या विशेष फेऱ्या

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

शारदीय नवरात्रौत्सवामध्ये प्रतापगडाकडे जाणाऱ्या आई भवानीदेवीच्या भक्तांसाठी पोलादपूर नगरपंचायतचे नगरसेवक प्रसाद इंगवले यांनी महाड एस.टी.आगाराकडे मागणी केल्यानुसार एस.टी.बसच्या विशेष फेऱ्या सुरू झाल्याची माहिती एस.टी. महामंडळाचे आगारप्रमुख शिवाजी जाधव यांनी दिली.

सोमवारी घटस्थापना झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी मंगळवारपासून सुरू होत असलेल्या महाड ते प्रतापगड एस.टी.बसच्या दररोज दोन फेरीचे दसऱ्यापर्यंतचे वेळापत्रक महाड एस.टी.आगाराकडून जाहिर करण्यात आले आहे.

यानुसार पहिली फेरी सकाळी महाडमधुन निघण्याची वेळ सकाळी ७ वाजता, पोलादपुर निघण्याची वेळ सकाळी साडेसात वाजता, प्रतापगडावरुन निघण्याची वेळ साडेअकरा वाजता, दुसरी फेरी महाडमधून निघण्याची वेळ दुपारी २ वाजता, पोलादपुर निघण्याची वेळ दुपारी अडीच वाजता, प्रतापगड वरुन निघण्याची वेळ सायंकाळी साडेपाच वाजता असे वेळापत्रक निर्धारित करण्यात आले आहे.

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभाव अधिसुचित क्षेत्र (नैना) साठी विशेष नियोजन प्राधिकरण कार्यक्षेत्रांत येणाऱ्या एकात्मिकृत नगर वसाहतीसाठीच्या पोहोच रस्त्यासाठी भूसंपादन

**शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित (नैना) बेलापूर, नवी मुंबई**

**नमुना-१**

**खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेणेबाबत जाहीर नोटीस**

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
मेट्रो सेंटर क्रमांक १ पनवेल
सिडको समाज मंदिर बिल्डिंग,
१ ला मजला, बांठिया हायस्कूल जवळ
सेक्टर १८,नवीन पनवेल, ता. पनवेल
जि.रायगड – ४१० २०६

**क्रमांक भूसं/न.मुं.आ.वि./नैना डी.पी.रोड/थेटखरेदी/६१०/२०२२ दिनांक २२/०९/२०२२**

ज्याअर्थी, शहर व औदृयोगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, बेलापूर यांचेकरिता नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभाव अधिसुचित क्षेत्र (नैना) साठी विशेष नियोजन प्राधिकरण कार्यक्षेत्रांत येणा–या एकात्मिकृत नगर वसाहतीसाठीच्या पोहोच रस्त्यासाठी मौजे खानावळे व भिंगारवाडी, ता. पनवेल येथिल जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने घेण्याबाबतचा प्रस्ताव शासन निर्णय, महसुल व वन विभाग क्र. संकिर्ण–०३/२०१५/प्र.क्र.३४/अ–२, दि१२/०५/२०१५ व शासन परिपत्रक क्र.एलक्युएन–०१/२०१७/ प्र.क्र. १२/अ–२, दि. २५/०१/२०१७ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने शहर व औदृयोगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, बेलापूर (नैना) यांचे नावे घेण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, मा.जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील आदेश क्र.भूसं/टे–८/मौजे खानावळे, भिंगारवाडी, ता. पनवेल/नैनाप्रस्ताव/२५४७७/४०६६७/ २०२२,दिनांक १०/०८/२०२२ अन्वये भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ चे नियम क्रमांक २ चे कलम छ अन्वये उक्त प्रकरणामध्ये भूसंपादनाची पुढील कार्यवाही करणेकामी उक्त प्रकरण उपजिल्हाधिकारी(भूसंपादन) मेट्रो सेंटर क्रमांक १ पनवेल यांचे कार्यालयाकडे सुपूर्द केले आहे. व प्रकरणी अधिनियम २०१३ मधील कलम प्रस्तावासंबंधी भूसंपादन अधिनियम, २०१३ च्या तरतुदीनुसार व भूसंपादन प्रक्रीयेमध्ये मुल्यांकन करतांना भूसंपादन अधिनियम २०१३ चे कलम २६ ते ३० मधील तरतुदींस अधिन राहून मुल्यांकन करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी आता,

१) उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी दत्तात्रेय नवले, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्रमांक १ पनवेल याद्वारे,

(एक) अनुसूची – एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने शहर व औदृयोगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, बेलापूर यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे, आणि,

(दोन) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या शेडयुल–१ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५% रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यांत येईल.

(तीन) संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी वाटाघाटीद्वारे शहर व औदृयोगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, बेलापूर यांचे नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला व अंतिमरित्या स्विकारणेस तयार असल्याबाबतचे संमतीपत्र (विकल्प) मागवित आहे.

२) संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्रमांक १ पनवेल यांचेकडे जाहिर नोटीस प्रसिध्दीच्या दिनांकापासून १ महिन्याचे आंत दाखल करावीत.

३) संमतीपत्राचा (विकल्प) विहीत नमुना उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्रमांक १ पनवेल यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत भूधारकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

४) सदर प्रकल्पासाठी निश्चित करणेत आलेल्या क्षेत्राच्या आराखडयाची प्रत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्रमांक १ पनवेल यांच्या कार्यालयामध्ये व प्राधिकरणाच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरिक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**अनुसूची–एक**
**खरेदी घ्यावयाच्या जमिनीचा तपशिल**

| अ.क्र. | गावांचे नांव | भूसंपादन करावयाच्या खाजगी जमिनीचे भूमापन क्रमांक/ गट क्रमांक | गाव नमुना ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र (हे.आर.) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|
| १ | खानावळे | १२९/२पै | ३.०८.६० | ०–१२–५२ |
| २ | भिंगारवाडी | ४५/१/२ | ०.३१.०० | ०–०७–०० |
| ३ | भिंगारवाडी | ४५/१/३ | ०.३१.०० | ०–०७–०० |
| ४ | भिंगारवाडी | ४५/१/४ | ०.३१.०० | ०–०७–०० |
| ५ | भिंगारवाडी | ४५/१/५ | ०.३१.०० | ०–०७–०० |
| ६ | भिंगारवाडी | ४५/१/६ | ०.३१.०० | ०–०७–०० |
| ७ | भिंगारवाडी | ४५/१/७ | ०.३१.०० | ०–०७–०० |
| ८ | भिंगारवाडी | ४५/१/८ | ०.३१.०० | ०–०७–०० |
| ९ | भिंगारवाडी | ४५/१/९ | ०.३१.०० | ०–०७–०० |
| १० | भिंगारवाडी | ४५/१/१० | ०.३१.०० | ०–०७–०० |
| ११ | भिंगारवाडी | १०/१ | ०.३८.९० | ०–०२–९४ |
| १२ | भिंगारवाडी | १२/० | ०.६२.२० | ०–०२–५० |
| १३ | भिंगारवाडी | ४९/१ | १.४७.२० | ०–०२–९८ |
| १४ | भिंगारवाडी | २२/० | ०.८२.४० | ०–२९–१३ |
| १५ | भिंगारवाडी | २४/४ | ०.६२.५० | ०–०६–७० |
| १६ | भिंगारवाडी | २५/० | ०.०३.०० | ०–०१–७३ |
| १७ | भिंगारवाडी | २६/० | ०.२२.०० | ०–०२–०४ |
| १८ | भिंगारवाडी | २७/२ | १.२३.४० | ०–२३–६१ |
| १९ | भिंगारवाडी | ३५/० | १.१७.६० | ०–००–३२ |

ठिकाण : पनवेल
दिनांक : २२/०९/२०२२

सही/–
**(दत्तात्रय नवले)**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)**
**मेट्रो सेंटर क्रमांक १ पनवेल**